सकाळ

# शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठात 'योग-संगम' हा कार्यक्रम घेतला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते. भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाद्वारे 'योग संगम' हा उपक्रम देशभरात साजरा करण्यात येत आहे. यात शिवाजी विद्यापीठ सहभागी झाले. यासाठी सुमारे ६५० योगसाधकांनी नोंदणी केली आणि सहभागही दर्शवला. विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) विभाग, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग, विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्र, वृत्तपत्रविद्या आणि जनसंज्ञापन अधिविभाग यांच्यातर्फे हा उपक्रम साजरा केला. खासदार धनंजय महाडिक, कुलगुरू डॉ. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यविज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. रामचंद्र पवार आदी सहभागी झाले. उपक्रमाचे विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' वाहिनीद्वारे थेट प्रक्षेपण केले. विद्यापीठामध्ये योग शिबिराला नियमित उपस्थित राहणाऱ्या साधकांना प्रातिनिधिक स्वरूपात श्री. महाडिक यांच्या हस्ते योग मॅट दिले.